# उपदेशक
उपदेशक
## उपदेशक पुस्तकनी वळख

उपदेशक हाई एक पुस्तक शे ते जीवनकरता शहाणपण शिकाडस. पुस्तकना हिब्रु लेखणना अर्थ “लोकसले एकत्र करस.” बऱ्याच बुध्दीमान सहमत शेतस की शलमोन राजा उपदेशक पुस्तकना लेखक व्हता, पण बाकीना सहमत नही. जर हाई पुस्तक लिखनारा शलमोन व्हता, तर ते जोडेजोडे 970-931 ईसापूर्वना जोडेपास लिखाई जायेल व्हतं, हाई तो जिवत व्हता तवयना शे. बाकीना बुध्दीमानसना अश ईश्वास शे की ते इतर कोणीतरी लिखेल शे, कारण काही येळा ते राजानी भाषाना ऐवजी सेवकनी भाषा वापरस त्या बुध्दीमानना अश ईश्वास शे की उपदेशक पुस्तक शलमोन राजाना काळपेक्षा खूप नंतर लिखाई गयं. उपदेशक 5:8-9

कदाचित ते 400 ते 200 ईसा पुर्व दरम्यानमा लिखाई गयं. सर्व काही पटकन नष्ट व्हनारा श्वासनासारखं शे अश सांगीन उपदेशक सुरवात करस 1:2 याना अर्थ आपलं जीवन अनी आपलं कार्य तात्पुरतं अनी समजणं कठीण शे. त्यानामाईन बरंच काही थोडा येळमा ईसराई जाई. त्यानामा बरंच काही आपला नियंत्रणना बाहेर शे. जीवन जश शे तशच स्वीकारानं अनी आपलाजोडे जे शे त्यानामाच आनंद मानानं चांगलं शे, 9:9 जीवनमाधलं सर्व अडचणी अनी आनंद यासनं प्रतिबिंबित करीन, पुस्तक देवनं भय धरानं अनी त्याना आज्ञा पाळाना धडातीन समाप्त व्हसा. 12:13 हाई सर्वासमा महत्वानी गोष्ट शे.

रूपरेषा

उपदेशक पुस्तकना लेखकनी अनी त्याना जीवनमाधलं काही अनुभवनी ओळख करी देस. *1:1-11*
जीवनना अर्थसंबधमा चर्चा करतस. *1:12–6:9*
शिक्षकसना सल्ला मा देल शे. *6:10–12:8*
शेवट वचनं सांगीसन पुस्तकना समारोप करतस की जीवनना संपुर्ण उद्देश देवनं भय अनी त्याना आज्ञा पाळानं शे. *12:9-14*

### जिवन व्यर्थ शे

1 यरूशेलममाधला राजा दावीदना पोऱ्या उपदेशक याना वचन.

2 व्यर्थ हो व्यर्थ! अस उपदेशक सांगस, व्यर्थ हो व्यर्थ! बठं काही व्यर्थ.
3 हाई *जगमां माणुस जे काही कष्ट करसं त्यामा त्याले काय फायदा?
4 एक पिढी जास अनी दुसरी येस; फक्त पृथ्वी जशीनी तशीच राहास.
5 सुर्य उगीसन मावळी जास अनी उगाना जागावर येस.
6 वारा दक्षिण दिशाकडे वाहास अनी परत उलटीसनं उत्तर दिशाले वाहास; तो
एकसारखा घुमीसनं परत परत आपली फेरी पुरी करसं.
7 बठया नदया समुद्रले जाईसन मियस तरीबी समुद्र भरस नही. ज्या ठिकानले
त्या जाईसन मियतस तठे त्या परत परत वाही राहातस.
8 बठं काही थकाडी देनाऱ्या शेतस; कोनलेच त्यानं वर्णन करता येस नही; ते
दखीसन डोयासना मन भरसं नही. ऐकीसन कानले समाधान मियस नही.
9 एकदाव व्हयी गये ते परत व्हस, जे करामा येस तेच परत करामा ई; हाई
जगमा नवीन आशे काहीच नही शे;
10 हाई दख, काही नवीन शे का? आशे एखादी गोष्टनीबारामा एखादानी सांगं
व्हई ती व्हई जायेल ऱ्हास.
11 जुनी आठवन राहीनी नही; मोरे जे काही व्हई त्यानी आठवन पुढलासले
राहावावू नही.

### उपदेशकना आनुभव

12 मी उपदेशक, यरूशेलममां इस्राएलना राजा व्हतू.
13 हाई जगमा जे काही व्यापार चालतस त्यासना नीट शोध लाईसन आपली
बुध्दीतीन त्याना रहस्य दखाले चित लावं; देवनी माणुसनीमांगे बराच कठीन कष्ट
लायी देयल शेतस.
14 हाई जगमा ज्या काम चालतस ते मी दखेल शेतस; ते दख, ते बठं व्यर्थ,
बिनकामना उदयोग शे.
15 जे वाकडं शे ते सरय व्हस नही; जे कमी शे ते मोजता येस नही.
16 मी आपला मनमा बोलनू, आपलामोरे यरूशेलमवर जेवढा राजा व्हई गयात
त्यासनापेक्षा मी जास्त ज्ञान प्राप्त करी लिधा; ज्ञान अनी बुध्दी यानी पुरी वयख माले
व्हई जायेल शे.
17 ज्ञान काय, येडापना अनी मुर्खपना काय शे , हाई समजी लेवाले मी चित्त
लावं, तवय माले आशे दखामा वनं की हाई बठं बिनकामना उदयोग शे.
18 जठे ज्ञान जास्त तठे चिंता जास्त; ज्याले बुध्दी जास्त त्याले दु:खबी जास्त.

* **1:3 1:3** सुर्यनाखाल

# 2

1 मंग मी आपला मनमा बोलनू, चाल, हासी मजाकतीन मी तुले आजमाडी
दखस; आते तु सुख भोगी ले; पण हाईबी व्यर्थ शे.
2 मी हसीले बोलनू, तु येडा शे. हासी मजाकले बोलनू, तुनापाईन काय फायदा
शे?
3 मानवपोऱ्यानी आपला बठा आयुष्यमा हाई जगमा काय करं व्हई ज्यामुये
त्याना हित व्हई याना निर्णय समजाले पाहीजे म्हनीसन विवेकनी मना मनमा
संयमतीन द्राक्षरसघाई शरीरले आराम कसे भेटी अनी मुर्खपना आचरनना अवलंबन
कशे करता येई याना मी आपला मनमा शोध करं.
4 ✡मी मोठमोठला काम हातमा लिधात; आपलाकता घरदार बांधात, द्राक्षना
मया लावात.
5 मी मनाकरता बागा अनी प्रत्येक प्रकारना झाडे लावात;
6 झाडे लायेल जंगलले पाणीना पुरवठा व्हवाले पाहीजे म्हनीसन मी तलाव
बनाडं.
7 मी✡ दास दासी ईकत लिधात; मना घरमा जन्म व्हयेल दास मना व्हयनात; बैल
अनी कळप यासना मोठा धन मनाजोडे व्हतं, एवढ धन याना आगोदर यरूशेलममां
कोनपानच नही व्हतं.
8 ✡मी सोना चांदीसना अनी राजासनीजोडे देशदेशमासला ज्या किंमती वस्तुसना
साठा मी करात. स्व:ताकरता गायक अनी गायिका अनी मनुष्यनापोऱ्याले सुख
देवाकरता बऱ्याच बाया ठेयात.
9 ✡आशे मी मोठा व्हयनू; मना आगोदर यरूशेलमा जे व्हई गये त्यासनापेक्षा मी
मोठा व्हयनू तरी मना बुध्दी कायम व्हती.
10 मना डोयासनी ईच्छा धरी ते मी त्यासनापाईन येगळं करं नही; मी कोनतबी
आनंदना ईषयनाबारामा आपल मन आवरं नही; कारन हाई बठी कष्टतीन मना मनले
बरं वाटे; हाई बठी कष्ट करीसन माले एवढंच वनं.
11 मंग मी मना हातघाई बनाडेल बठा काम अनी कष्ट याना निरीक्षन करं; पण
दखा; बठं काही व्यर्थ अनी बिनकामना उदयोग शे; जगमा हित व्हई आशे काहीच
नही शे.
12 तवय मी, ज्ञान, येडापना अनी मुर्खपना यासकडे मी ध्यान दिधं; कारन
राजानी मांगेतीन येनारा माणुसना हातघाई काय व्हई? आजपावोत लोके जे करत
वनात तेच तो करस.

---

✡ **2:4 2:4** १ राजे ✡ **2:7 2:7** १ राजे 4:23 ✡ **2:8 2:8** १ राजे ✡ **2:9 2:9** १
इतिहास 29:25

13 मंग मना नजरमा वनं की आंधारपेक्षा जशे प्रकाश श्रेष्ठ शे तशे मुर्खपेक्षा ज्ञान
श्रेष्ठ शे.
14 ज्ञानना डोया त्याना डोकामा राहास; अनी मुर्ख आंधारमा चालस; आशे
राहीसन सर्वासना वेग एकच शे आशे मना ध्यानमा वनं.
15 मंग मी आपला मनमां बोलनू, मुर्खसना जो वेग तोच मना, तर मी एवढा ज्ञानी
व्हयनू तरी कसाले? मी आपला मनमा बोलनू, हाई व्यर्थ शे;
16 मुर्खसनामायक ज्ञान कायम राहास नही; कारन मोरे येनारा काय बठासले
ईसर पडनार शे, तर दख, ज्ञानी कशा मरस पावस तर मुर्खनामायक!
17 यावरतीन माले मना जीवनना ईट वना; कारन हाई जगमा जे काही व्यवहार
व्हतस त्या माले चुकीना वाटनात; हाई बठं काही व्यर्थ अनी बिनकामना उदयोग
शे.
18 मना बठा कष्टना फय मनामांगेतीन येनारा माणुसले सोडीसन माले जानं पडी;
हाई ध्यानमा ठेईसन मी हाई जगमा जे कष्ट करात त्याना माले संताप वना.
19 तो चांगला निंघी का वाईट निंघी हाई कोनले माहीत? तरीबी जे काही मे
कष्ट करीसनं अनी शहापन खर्च करीसन हाई जगमा जे प्राप्त करेल शे त्यावर तो
ताबा चालाडी. हाईबी व्यर्थ शे!
20 तरीबी हाई जगमा जे काही मी कष्ट करत व्हतू ते मी सोडी दिधं; अनी मी
निराश व्हई गयू.
21 कोनी सुज्ञता, ज्ञान अनी हुशारीतीन कष्ट करीसन प्राप्त करानं; अनी
त्यानाकरता ज्या माणुसनी कष्ट करात नही त्याना वाटाले ते ठेईसन सोडी देवानं;
हाईबी व्यर्थ अनी मोठं संकट शे.
22 माणुस जे काही कष्ट करस अनी जीवनी उलथा पालथा करीसन हाई जगमा
खटपट करस त्याना त्याले काय लाभ शे?
23 ✡त्याना बठा दिन दुखना राहातस; त्यानी दगदग कष्टमय राहास; रातलेबी
त्याना मनले चैन नही राहास; हाईबी व्यर्थच शे.
24 ✡माणुसनी खावानं, पेवानं अनी कष्ट करीसन आपला जीवले सुख देवानं
यानापेक्षा दुसरं सुख कोनतच नही; हाई देवकडतीन भेटस आशे मना ध्यानमा वनं.
25 कारन त्याना प्रसादशिवाय खावापेवानं अनी सुख भोगानं हाई कोनले प्राप्त
व्हई?

---

✡ **2:23 2:23** 5:7 ✡ **2:24 2:24** लूक 12:19; १ करिंथ 15:32

26 जो माणुस देवना नजरमा चांगला त्याले तो बुध्दी, ज्ञान अनी सुख हाई देस;
साठा कराना काम देव पापीसले देस; ते हयानाकरता की ज्या देवना नजरमा चांगला
त्यासले ते देवानं; हाई व्यर्थ अनी बिनकामना उदयोग शे.

# 3

## प्रत्येक गोष्टले येळ काय राहास

1 प्रत्येक गोष्टले येळ काय राहास; हाई जगमां प्रत्येक कामले येळ र्‍हास;
2 जन्म व्हवानी येळ अनी मरानी येळ, रोप लावानी येळ अनी रोप उपटानी येळ
र्‍हास;
3 वध करानी येळ अनी बरं करानी येळ, मोडानी येळ अनी बांधानी येळ र्‍हास;
4 रडानी येळ अनी हासानी येळ र्‍हास; शोक करानी येळ अनी नाचानी येळ
र्‍हास;
5 दगड फेकानी येळ र्‍हास अनी दगड गोया करानी येळ र्‍हास; दुसरा लोकेसले
अलींगन देवानी येळ र्‍हास अनी अलींगन आवरी धरानी येळ र्‍हास;
6 गोष्टि दखानी येळ र्‍हास अनी दखाडानं थांबाडानी येळ र्‍हास. वस्तुसले
एकजागे करानी येळ र्‍हास अनी ती फेकी देवानी येळ र्‍हास;
7 कपडा फाडानी येळ र्‍हास; अनी त्या शिवानी येळ र्‍हास; शांत बसानी येळ
र्‍हास अनी बोलानीबी येळ र्‍हास;
8 प्रेम करानी येळ र्‍हास अनी व्देष देवानी येळ र्‍हास; युध्द करानी येळ र्‍हास
अनी शांती करानी येळ र्‍हास;
9 काम करनारा जे कष्ट करसं त्यामा त्याले काय फायदा?
10 देवनी मानवजातले जे काम पुरा कराले लायेल शे ते मी दखेल शे;
11 देवनी त्याना येळनुसार प्रत्येक गोष्ट बराबर बनाडेल शे, त्यानी त्याना मनमा
अनंतकायना कल्पना तयार करेल शे; तरी देवना पहिलापाईन ते शेवटपावोतना काम
माणुस समजु शकावू नही.
12 त्यासनी जीवता शेत तोपावोत खुश र्‍हावानं अनी चांगलं करत र्‍हावानं
यानाशिवाय उत्तम दुसरं काहीच नही आशे माले समजनं.
13 अनी प्रत्येक माणुसनी खावानं, पेवानं अनी बठा कामसमाईन आनंद कशे
मियाडानं हाई देवनी देणगी शे.

14 देव जे बी करसं ते सर्वकाय राहानार शे आशे माले समजनं. त्यामां जास्त
काहीच मियावू नही अनी त्यामाईन काहीच कमी व्हवाऊ नही. कारन लोकेसनी
आदरतीन त्यानाजोडे येवाले पाहिजे म्हनीसनं देवनी हाई बठ काही करेल शे.
15 जे काही व्हई राहीनं शे ते याना आगोदर व्हई जायेल शे; अनी जे काही
व्हवाव शे ते याना पहीलेच व्हई जायेल शे; देव व्हयेल गोष्टी मनुष्यसनापुढे आणस.

### जीवनमा अन्याय

16 अनी हाई जगमा न्यायना ठिकान दखं तर तठे दुष्टता अस्तित्वमां व्हती.
अनी नीतीमानना ठिकान दखं तवय तठे कायम दुष्टता सापडस.
17 मी मना मनमा बोलनू, देव प्रत्येक गोष्टनी अनी प्रत्येक कामनी योग्य येळले
न्याय करी.
18 मी मना मनमा बोलनू, देव मानवजातनी पारख करस ते यानाकरता की
आम्हीन जनावर शेतस हाई दखाडामा येवाले पाहिजे.
19 जे मानवजातमा घडस तेच जनावरसमा घडस; जशा जनावर मरतस तशे
माणसेबी मरतस; त्या बठा एकच हावामाईन श्वास लेतस, जनावरपेक्षा मानवजात
वरचढ नही; बठं काही व्यर्थ शे आशे वाटस नही का?
20 बठाच एकच ठिकानले जातस, बठं काही माटीपाईन येयल शे अनी बठं
काही माटीले जाईसन मियतीन.
21 मानवजातना आत्मा वर जास अनी जनावरना जीव खाल जमीनमा जास हाई
कोनले माहीत?
22 मंग मी दखं तवय, माणुसनी आपला काममा खुश ऱ्हावानं यानापेक्षा उत्तम
काहीच नही, कारण हाऊ त्याना वाटा शे. कारण तो मरावर जे काही व्हई ते दखाले
त्याले कोन परत लई?

# 4

1 मी परत एकदाव दखं, हाई जगमा जे काही जाचजुलूम चालतस ते मी दखं,
दुखी लोकेसना आसु दखा, तठे त्यासले कोन सोडाई आशे कोनीच नही. त्यासवर
ज्या जुलूम करतस त्यासनी हातमा ताकद शे; पण दुखी लोकेसले सोडावाले कोनीच
नही.
2 त्याकरता मी ज्या मरी जायेल शेतस त्यासना अभिनंदन करस, ज्या आज
जीवत शेतस अनी आज जगी राहीना शेतस, त्यासना नही.
3 ज्याना आजुन जन्म व्हयेल नही, ज्या हाई जगमा वाईट कृत्य करतस ते त्यानी
आजुन दखं नही; तो त्या दोनीपेक्षा बरा शे आशे मी समजस.

4 मंग मी दखं तवय; बठा कष्ट अनी कारागीरना काम आशे शे, ज्यानामुये त्याना
शेजारना हेवा करस. हाई बठं व्यर्थ शे अनी बिनकामनी कोशीस शे.
5 मुर्ख हातनी घडी घालीसन शांत बसी ऱ्हास अनं आपलाच शरीरना नाश करी
लेस.
6 पण भरेल दोन मुठपेक्षा अनी बिनकामना प्रयत्न करापेक्षा आप आपला काम
करीसन मुठभर कमाई करेल बरी शे.

7 मी परत बिनकामना गोष्टीसनाबारामा ईचार करं तवय हाई जगमासल्या बठया
गोष्टी व्यर्थ शेतस.
8 तठे आशा प्रकारना माणुस शे, तो एकलाच शे, त्याले कोनीच नही, त्याले
पोऱ्या किवा भाऊ नही. पण तठे त्याना कष्टले अंत नही, जे धन तो कमाडस त्यामा
त्याले समाधान नही, तो स्व:तालेच ईचारस, एवढा कष्ट मी कोना करता करी राहीनु
शे? मना जीवनना सुख हिसकाई ली राहीनू शे, हाई कोनाकरता? हाई व्यर्थ शे,
कष्टमय शे.
9 एकपेक्षा दोन माणसे काम करनारा बरा शेतस; त्या एकजागे काम करीसन
चांगल कमाडु शकतस.
10 जर एखादा पडना तर त्याना मित्र त्याले उचलस, पण जो एकलाच ऱ्हास
अनी तो जर पडना त्याले उचलाले कोनीच ऱ्हास नही; त्यानामांगे कायम दु:ख
ऱ्हास.
11 अनी जर त्या दोनी एकजागे झोपनात तर त्यासले ऊब लागस. पण एकलाले
ऊब कशी लागी?
12 जो माणुस एकला शे त्याले जर कोनी भारी पडना तर दोनीसले त्याना ईरोध
करता ई. तीनपदरी दोर सहजा सहज तुटस नही.

13 गरीब पण शहाना तरूण हाऊ धैयडा अनी मुर्ख राजापेक्षा चांगला ऱ्हास; तो
धैयडा राजा त्याले देल इशाराकडे ध्यान देस नही.

14 कदाचित तो तरूण राजा आपला राज्यमा गरीब जन्मना व्हई नहीते तुरूंगमाईन
राज्य कराले बाहेर वना व्हई.
15 तरीबी, ज्या बठा ह्या जगमा चालतस त्यासले मी दखं, जो दुसरा तरूण
त्यासना जागवर राजा म्हनीसन उभा राहिना त्या त्याले शरण गयात.
16 त्या बठा लोकेसवर तो अधिकारी व्हयना, त्याना अंत नही व्हता, तरी ज्या
लोके मोरे येनार शेतस त्या त्याना ईषयी आनंद करावूत नही, खरच हाई व्यर्थ अनी
बिनकामना उदयोग शे.

# 5

## ईचार न करता बोलानं धोकादायक

1 जवय तु देवना मंदिरमा जास तवय आपली वागनुककडे ध्यान दे; तठे ऐकाले
जाय. ऐकी लेवानं हाई मुर्खना यज्ञपेक्षा चांगल शे; जीवनमा त्या वाईट करतस हाई
त्या वळखतस नही.
2 तुना तोंडघाई बोलानी घाई करू नको, अनी देवनासमोर कोनतीबी गोष्ट उच्चार
कराले उतावळा करानं नही, कारण देव स्वर्गमा शे अनी तु पृथ्वीवर शे, म्हनीसन
तुना शब्द मोजकाच राहावाले पाहिजे.
3 जर तुमले बऱ्याच गोष्टी करन्या व्हतीन तर तुम्हीन त्याईषयी काळजी करतस,
अनी तुमले बराचदाव वाईट सपन पडतस, अनी तुम्हीन बराच बोलतस, अनी
बहुतेक करीसन बऱ्याच मुर्ख गोष्टी बोलतस.
4 जर तु देवले नवस करं व्हई तर ते फेडाले येळ लावू नको; कारण देव मुर्खसवर
प्रसन्न व्हस नही. जे नवस तु करेल शे त्यानी फेड कर.
5 नवस करानं अनी तो फेडानं नही त्यानापेक्षा ते नही करेल बरं शे.
6 आपला तोंडमुये आपला शरीरले शिक्षा व्हवु देऊ नको, मी चुकीसन बोलनू
अश देवनादूतनासमोर बोलू नको; तुना बोलानं राग ईसन देवना क्रोध तुनावर काबर
येवाले पाहिजे, तुना हातना काम त्यानी काबर नष्ट करान?
7 कारण बराच स्वप्न दखनं अनं बराच भाषण करानं ह्या वायफळ गोष्टी शेतस,
पण तु देवना भय धरीन ऱ्हाय.

## जीवन व्यर्थ

8 जवय एखादा प्रांतमा गरीब लोकेसवर जुलूम व्हई राहीना शे, न्याय अनी
वागनुक योग्य मिळस नही, तर त्यामा आश्चर्य वाटासारख काहीच नही, कारण
वरीष्ठवर त्यानापेक्षा वरीष्ठसनी नजर ऱ्हास.
9 आजुन, पृथ्वीना फय सर्वासकरता शे, अनी राजा स्व:ताकरता वावरमासला
कमाई लेस.
10 जो पैसासवर प्रेम करस तो पैसासघाई सुखी ऱ्हास नही अनी जो संपत्तीवर
प्रेम करस त्याले जास्त लाभ ऱ्हास; हाईबी व्यर्थ शे.
11 जशी भरभराटी व्हस, तशे खानाराबी वाढतस; आपला डोयासघाई
दखाशिवाय तठे मालकले संपत्तीमा काय लाभ व्हस?

12 जो काम करस त्यानी झोप गोड ऱ्हास; तो जरासा खावो कि जास्त खावो,
पण श्रीमंत माणुसले त्यानी संपत्ती झोपू देस नही.
13 हाई जगमा आजुन एक संकट मी दखेल शे, ते म्हणजे श्रीमंतनी आपला नाश
कराकरता राखी ठयेल धन शे.
14 जवय श्रीमंत माणुस आपली धनसंपत्ती चुकीन्या गोष्टीसमा गमाडस, ज्यामुये
त्याना घरमा जन्मेल पोऱ्या त्याले देवाले त्याना हातमां काहीच राहास नही.
15 ✡जशे माणुसना जन्म मायना पोटमाईन नग्न व्हयेल शे, जशा तो व्हना तशा
तो नग्न व्हईसन परत जाई, आपला काममाईन आपला हातमा काहीच लई जावावू
नही.
16 दुसरा एक मोठा संकट दखेल शे, तो जशा वना तशा परत जाई, म्हनीसन जो
कोनी वायफळ काम करस त्याले काय फायदा?
17 तो त्याना आयुष्यभर चिंता करी ऱ्हास अनी शेवट तो दु:खी अनी रागीट
व्हई जास.
18 माले जे बरं अनं चांगलं दखायनं ते हाई शे; माणुसनी खावानं पेवानं अनी
देवनी त्याले जे आयुष्य देल शे त्या बठा दिन तो ज्या कामदंधामा कष्ट करस त्यामा
सुख भोगानं हाई त्यानाकरता चांगलं अनी उत्तम शे.
19 जर देवनी एखादा माणुसले संपत्ती, मालमत्ता अनी या गोष्टीसनी उपभोग
लेवानी शक्ती देल व्हई तर त्यानी त्याना उपभोग लेवाले पाहिजे. त्यानाकडे ज्या
गोष्टी शेतस त्यासना स्विकार कराले पाहिजे, अनी कामबी आनंदमा कराले पाहिजे.
ती देवनी देल भेट शे.
20 माणुसले जगाले जास्त वरीस नही राहातस, म्हनीसन त्यानी आयुष्यभर
बठया गोष्टीसनी आठवन ठेवाले पाहिजे. देव त्याना आवडता काम कराले मग्न
ठेई.

# 6

1 हाई जगमा मी आजुन एक संकट दखं, अनी ते माणुसनीकरता भलतं भारी शे;
2 देव एखादा माणुसले भलतं संपत्ती, धनदौलत एवढी देस की त्याले जी इच्छा
व्हई ते त्याले मियस, त्याले काहीच कमी पडाव नही. पण देव त्याले नंतर त्याना
उपभोग लेवानी शक्ती देस नही, त्याना ऐवजी कोनतरी दुसराच बिन वयखना
उपभोग लेस हाई व्यर्थ शे, भलतं वाईट शे.

✡ **5:15 5:15** ईयोब 1:21; स्तोत्रसंहिता 50:17; १ तिमथ्य 6:7

3 जर एखादा माणुसनी शंभर पोऱ्यासले जन्म दिधा अनी बराच वरीस जगना,
त्याना आयुष्यना वरीस बराच राहीनात, त्याना जीवले सुख मियन नही अनी
मानसन्मानतीन त्याले वाट लावं नही व्हई तर त्यानापेक्षा मरेल बाळ बरा शे, आशे
मी सांगस.
4 जशा तो जन्म व्हयेल बाळ बिनकामना शे, आंधारामा नाहीसा व्हस अनी त्यानं
नाव लपेल ऱ्हास.
5 त्यानी कवयच सुर्य दखा नही अनी त्याले काहीच माहित नही, त्याले त्या
माणुसपेक्षा जास्त विसावा शे.
6 तो माणुस दोन हजार वरीसबी जगना पण तो चांगल्या गोष्टीसना उपभोग लेवाले
शिकना नहीं, मंग प्रत्येक झन ज्या जागवर जातस तठेच तो बी जाई.
7 मनुष्यना बठा कष्ट पोटकरता शेतस, तरी त्यानी भुक भागस नही.
8 मुर्खपेक्षा शहानाले काय जास्त फायदा व्हस? तशेच जो गरीब राहीसन दुसरा
लोकेसनीसंगे कशे वागानं हाई ज्याले समजस त्याले तरी काय फायदा व्हस?
9 ज्या डोया दखीसन समाधान राहातस ते चांगलं शे, मन इकडे तिकडे
भटकापेक्षा हाई बरं शे.
10 जे काही व्हयनं त्याना नाव पहिला पाईन ठेयेल शे अनी माणुस काय शे हाई
समजाडेल शे, तो फक्त माटी शे त्यानापेक्षा जो समर्थ शे त्यानासंगे भांडन करता येस
नही.
11 जास्त बोलावर त्याले काही अर्थ ऱ्हास नही, त्यामा मनुष्यले काय फायदा?
12 मनुष्य हाऊ ज्याले काही अर्थ नही आशे आयुष्य सावलीनामायक काढस,
त्यामा त्याले काय फायदा हाई कोनले माहीत? कारण तो मरावर हाई जगमा काय
व्हई हाई मनुष्यले कोण सांगी?

# 7

## जीवननाबारामा ईचार

1 ✡महागा सुंगधी द्रव्यपेक्षा चांगलं नाव ऱ्हावानं हाई बरं शे, जन्मदीनपेक्षा मरणना
दिन बरा ऱ्हास.
2 मेजवानीना घर जावापेक्षा शोक करनारानी घर जायेल बरं ऱ्हास, कारन परतेक
माणुसना शेवट हाईच शे, ज्या जिवत शेतस त्यासनी हाई मनमा राखी ठेवानं म्हनीसन
जिवत हाई तुमना मनमा कायम राही.

✡ **7:1 7:1** नीतिसूत्रे 22:1

3 हासी मजाक करापेक्षा शोक करानं चांगलं शे, दु:खी तोंड नंतर आनंदी व्हस.
4 ज्या शहाना राहातस त्यासना मन शोक घरकडे लागस, पण मुर्खना चित्त हसी
मजाककडे लागस.
5 मुर्खसना गाना ऐकापेक्षा शहानासनी निषेधवानी ऐकेल बरं र्‍हास
6 कारण मुर्खसना हासू भांडानीखाल जळेल काटाकुटासना कडकडनारामायक
र्‍हास; हाई व्यर्थ शे.
7 जुलूम करावर शहाना येडा बनतस; लाच लेवामुये बुध्दी भ्रष्ट व्हस.
8 एखादी गोष्टनी सुरवात पेक्षा तिना शेवट व्हयेल बरा र्‍हास. गर्व करनारा
माणुसपेक्षा सहन करनारा माणुस बरा र्‍हास.
9 ✡मन उतावीळ व्हईसन राग येऊ देवानं नही, कारण राग मुर्खसना मनमा घर
करीसन र्‍हास.
10 या दिनपेक्षा आगोदरना दिन बरा व्हतात आशे काबर? आशे ईचारानं नही;
हाई ईचारानं शहानापण नही शे.
11 मिळेल धनसंपत्तीनासंगे शहानापण राहीनं तर बरं र्‍हास; कारण हाई जगमा
जन्म व्हयेलसना हितना शे.
12 ज्ञान आश्रय देनारा शे अनी पैसाबी आश्रय देनारा शे; ज्ञानपाईन आशे फायदा
र्‍हास की ज्यानापाण शहानपण र्‍हास तो त्याना जीव वाचाडस.
13 देवनी करनी दखा; त्यानी जे वाकडं करेल शे ते कोनीच सरळ करावूत
नही?
14 जवय येळ चांगली राही तवय आनंद कर; पण जवय संकटमा सापडसी तवय
विवेकतीन वाग; कारण माणुसनीमांगे काय व्हई हाई त्याले कळाले नको म्हनीसन
देवनी सुखदूखले जोडे जोडे ठेयेल शेतस.
15 एखादा नीतिमान चांगल आचरन करीसनबी नष्ट व्हस; अनी एखादा दुष्ट
वाईट वागीसनबी त्याले जास्त आयुष्य भेटस; हाई बठं मी मना व्यर्थ जायेल दिनमा
दखेल शे.
16 तोंड देखल्या नीतिमान व्हवू नको; मर्यादानीबाहेर राहीसन शहानपण दखाडू
नको; तु आपला नाश का बरं करी लेवानं?
17 दुष्टपना जास्त करू नको; मुर्ख बनु नको; तु पहिलेच काबरं मरानं?
18 याले तु धरी र्‍हावान; अनी त्यानापाईन हात मांगे लेवान नही हाई बरं शे;
कारण देवले जो घाबरीसन राहतस तो पार पडी.

---

✡ **7:9 7:9** याकोब 1:19

19 नगरमासला दहा अधिपतीसपेक्षा जास्त रक्षण शहानाले शहानपण करस.
20 चांगला ईचारतीन वागनारा अनी पाप नही करनारा आशा नीतिमान माणुस
हाई जगमा सापडस नही.
21 बोलेल बठा शब्दसकडे ध्यान देऊ नको; जर ध्यान दिधं तर तु तुना नोकरले
शिव्याशाप देतांना ऐकशी;
22 कारण तु बी दुसरासले रोज शिव्याशाप देयल शेतस हाई तुले माहीत शे.
23 या बठया गोष्टी मी विवेकतीन आजमाडी दखेल शेतस; आपलाले बराच ज्ञान
मियाले पाहीजे आशे माले वाटनं, पण ते मनापाईन दुर राहीनं.
24 जे शे ते बराच दूर अनी गुढ शे; त्याना शोध कोनले लागी?
25 ज्ञान अनी विवेक हाई समजीसन त्याना रहस्य वळखानं अनी त्याना शोध
लावानं, अनी दुष्टपना हाई फक्त मुर्खपना शे अनी मुर्खपना हाई येडापना शे, हाई
समजाले पाहीजे म्हनीसन मी परत मना चित्त या गोष्टीसकडे लाया.
26 माले मरनपेक्षा दु:ख वाटी आशी वस्तु सापडनी, ती म्हणजे पाशरूप बायी शे,
तिना मन पारधीसना जाळा शे; तिना हात साखळी शेतस; जो मानूस देवले आवडस
तोच तिना हातमाईन सुटस; पण पापी तिना हातमा सापडस.
27 उपदेशक सांगस; हिशोब दखाले गयू तवय गोळाबेरीज माले सापडनी ती
आशी;
28 पण मी आजपावोत सापडाई राहीनू शे तरी माले सापडनी नही ती हाई शे;
हजारसमां एक माणुस माले सापडना; पण तेवढया बायासमा माले ऐकबी बायी
सापडनी नही.
29 दखा, माले एवढेच सापडनं की देवनी मनुष्यले सरळ आशे तयार करेल शे,
पण तो बऱ्याच कल्पनासना मांगे लगी जायेल शे.

# 8

1 ज्ञानी मानुसनीमायक कोन शे? कोनत्याबी गोष्टीसना उलगडा कराले कोनले
समजस? ज्ञानी मानुसना तोंड तेज देस; ज्यामुये त्याना मुखना कठीनपना दुर व्हई
जास.

### राजानी आज्ञा पाळ

2 मी तुले आशे सांगस की राजानी आज्ञा पाळ; तु परमेश्वरनी शपथ लेल शे
म्हणीन ती पाळ.

3 त्याना समोरतीन जावानी घाई करू नको; वाईट गोष्टीसकरता थांबू नको; कारण
त्याले जे आवडस ते तो करस.
4 राजाना शब्द ताकतवान ऱ्हास, तु हाई काय करस आशे त्याले कोन म्हनी?
5 जर राजानी आज्ञा पाळसी तर सुरक्षित ऱ्हासी, पण जो बुध्दीमान ऱ्हास त्याले
हाई येळ माहीत ऱ्हास अनी त्याले हाईबी माहीत ऱ्हास कि कवय बोलानं शे.
6 प्रत्येक गोष्टले नेमेल काळ अनी न्याय करानं येळ ऱ्हास, कारण मनुष्यना
संकट बराच शेतस.
7 मोरे काय व्हई हाई त्याले माहीत नहीं ऱ्हास, कशे काय व्हई हाई त्याले कोन
सांगी?
8 जीववर कोनताच माणुसनी सत्ता ऱ्हास नही की तो त्याले जावू देवावू नहीं;
मराना दिन कोनाच हातमा नहीं; हाई संकट कोनलेच सोडावू नहीं, दुष्कर्म आपला
मालकले वाचाडावू नहीं.

## दुष्ट अनी नीतिमान

9 हाई बठं मी दखेल शे; हाई जगमा ज्या गोष्टी चाली राहीन्यात हया बठया
गोष्टीसकडे मी मना चित्त लायेल शे; एक मनुष्य दुसरावर सत्ता चालाडीसन त्याना
नुकसान करस.
10 त्या येळले मना नजरमा आशे वनं की दुष्टले मुठमाटी दिसन तो विश्राम
पावस; अनी नीतिमानतीन वागनाराले पवित्र ठिकान सोडीसन जाना पडस, अनी
गावमासला लोके त्याले ईसरी जातस हाई बी व्यर्थ.
11 दुष्टले लगेच शिक्षा व्हस नही म्हनीसन मनुष्यनापोऱ्यानं मन दुष्कर्म कराले
तयार व्हस.
12 पापी शंभर येळ पाप करना अनी बराच वरीसन जगना; आशे व्हई तरी माले
माहीत शे ज्या देवले मानपान देतस त्यासनं कल्यान व्हई.
13 पण ज्या दुष्ट शेतस त्यासना भलं व्हवावू नहीं; त्यासले जास्त आयुष्य मिळावू
नहीं; त्यासना जीवन सावलीनामायक शे, कारन त्या देवले मानपान देतस नही.
14 हाई जगमा आजुन एक बिनकामनी गोष्ट व्हस; आशे काही नीतिमान ऱ्हातस,
दुष्टसनी करनीमुये त्यासनी जी गती व्हवाले पाहीजे ती यासनी व्हस अनी आशे
काही दुष्ट ऱ्हातस की नीतिमानसनी करनीमुये त्यासनी गती व्हवाले पाहीजे ती
यासनी व्हस. मी हाई सांगस हाई बठं व्यर्थ शे.
15 मंग मी आनंदनी शिफारस करी, कारण मनुष्यनी खावानं, पेवानं अनी
आनंद करानी यानापेक्षा पृथ्वीनाखाल दुसरं काहीच उत्तम नही शे. कारण त्यासना

आयुष्यना दिन देवनी त्यासले पृथ्वीवर देयल शेतस त्याना कष्टमा हाई त्यानाजोडे
राही.
16 तवय ज्ञान समजाकरता अनी जे काम हाई जगमा चाली राहीना शे ते दखाले
जवय मी मना चित्त लावं. कारण रातदिन ज्याना डोयाले डोया लागस नही आशेबी
लोके राहातस.
17 तवय माले देवना बठा काम दखीसन आशे समजन की जे काम हाई जगमा
करामा ई राहीना शे ते माणुसले शोध लावता येस नही, कारण ते दखी काढाले
माणुसनी कितलाबी कष्ट करात तरी त्या सापडावू नही अनी तशेच एखादा ज्ञानी
मानुस, माले माहीत शे आशे जरी बोली, तरी त्याले ते सापडावू नही.

# 9

1 मी बठया गोष्टीसनी कायजीपुर्वक ईचार करा, नीतिमान अनी ज्ञानी माणुस
अनी त्याना काम समजानी कोशीस करात, त्या बठा देवना हातमा ऱ्हास. कोनीतरी
आपला व्देष करी अनी प्रेमना करी यानाबदल काहीच माहीत नही ऱ्हास.
2 जे काही व्हस ते बठं सारखच व्हस, नीतिमान अनी दुष्ट, चांगला अनी वाईट,
शुध्द अनी अशुध्द, यज्ञ करनारा अनी यज्ञा नही करनारा या बठासनी गती एकच
व्हस, चांगला मानुस पापी मानुसनामायक मरी. शपथ लेनारानी, तशेच शपथ
देनारानी त्यानी गती तशीच व्हई.
3 हाई जगमा जे काही घडस त्यामा हाई एक आशे वाईट शे की बठासनी
सारखीच गती व्हई, मनुष्यनापोऱ्याना मनमा दुष्टता भरेल ऱ्हास, त्यासना मना बठा
आयुष्यभर भ्रांतीमय ऱ्हास, मंग त्या मरेलसले जाईसन मिळतस.
4 जो माणुस अजुन जिवत शे, त्याले आशा ऱ्हास, पण जिवत कुत्रं मरी जायेल
सिंहनापेक्षा चांगला ऱ्हास.
5 आपलाले मरनं शे हाई जिवंतसले समजस; पण मरेलसले काहीच समजस
नही; त्यासले आणखी काही फळ भेटावं नही; त्यानं स्मरण कोणले ऱ्हास नही.
6 त्यासना प्रेमना, व्देष अनी मत्सर हाई आगोदरच नष्ट व्हई जायेल शेतस, अनी
जे काही हाई जगमा करामा ई राहीना शे, त्यामा त्यासले परत जागा मिळावू नही.
7 तुना मार्गतीन जाय, आनंदमा तुनी भाकर खाय अनी आनंदमा द्राक्षरस पेय,
कारण देवनी तुना चांगला काम साजरा कराकरता मान्यता देयेल शे.
8 तुना कपडा कायम शुभ्र राहावाले पाहीजे अनी तुना डोकाले तेलना अभिषेक
ऱ्हावाले पाहीजे.

9 तुना ज्या व्यर्थ आयुष्यना दिन त्यानी तुला हाई जगमा देयल शेतस त्यामा, तुना
बठा व्यर्थ दिनमा तुनी बायको जी तुले प्रिय शे तिनासंगे तु प्रेमतीन आयुष्य घालव.
कारण आयुष्यमा अनी तुना उदयोगधंदामां पृथ्वीवर कष्ट करस तठेबी तुना हाऊच
वाटा शे.
10 जे काही काम तुना हातमा ई ते बठे ताकदतीन कर, कारण ज्या कबरमा
आपन जानार शेतस तठे काम, ईचार, ज्ञान अनी शहापन नही शे.
11 मी पृथ्वीवर बऱ्याच गोष्टी दख्यात, जोरमा पयनारा शर्यंत जिकस नही,
ताकदवान लढाई जिकस आशे व्हस नही, शहानानी अन्न खावानं आशे व्हस नही,
जो ज्ञानी शे त्यानावरच कृपा व्हस आशे नही, त्याना ऐवजी संधी अनी येळ याना
बठासवर परीनाम व्हस.
12 कोनलेच त्याना मरानी येळ माहीत नही, जशा मासा मरानी जाळामा सापडस,
नहीते फासामा आटकनारा चिडानामायक, तशेच जनावर, मनुष्यजात संकटना
येळले तो त्यासनावर आचानक ई पडना मनजे तो फासामा आटकस.

### बुध्दीमान अनी मुर्खसना ईचार

13 ज्ञानीबी मी हाई जगमा दखात अनी त्या माले महत्वना वाटनात.
14 एक धाकलं शहर व्हतं, एक मोठा राजानी त्या शहराना ईरोधमा लढाई करी
अनी त्यानी त्याना ईरोधमा सेना शहरना आजुबाजूले ठेवात.
15 पण त्या शहरमा एक विद्वान व्हता, तो विद्वान गरीब व्हता, पण त्यानी आपला
ज्ञानतीन त्या शहरना बचाव करा, बठं काही सरावर लोके त्या गरीब माणुसले ईसरी
गयात.
16 मंग मी निर्णय लिधा, ताकदपेक्षा ज्ञान श्रेष्ठ शे पण गरीबना ज्ञानले तुच्छ
मानतस अनी त्याना शब्द ऐकतस नही.
17 विद्वान मानुसनी शांततातीन सांगेल शब्द हाई मुर्खसना राजानी वरडीसन
सांगेल शब्दसपेक्षा चांगला ऱ्हातस.
18 शहानपण हाई युध्दमासली तलवार अनी भाला यानापेक्षा चांगला ऱ्हास. पण
एखादा पापी बऱ्याच चांगल्या गोष्टीसना नुकसान करस.

# 10

1 जशा मरेल माख्या सुगंधी तेल दुर्गंधीत करतस तशा मुर्खपना हाई शहानपण
अनी मानपाण यासना नाश करु शकतस.
2 शहाणना मन त्याना उजवीकडे शे, पण मुर्खना मन त्याना डावीकडे ऱ्हास,

3 जवय मुर्ख वाटधरी जाई र्‍हास तवय त्याना ईचार आर्धावट र्‍हातसं हाई दखाई
जास, म्हणीसन तो मुर्ख शे हाई बठासले दखास.
4 तुमना वरीष्ठ लोके तुमनावर चिडेल शेतस म्हणीसन काम सोडानं नही, शांत
र्‍हावामुये राग शांत व्हई जास.
5 एक संकट मी हाई पृथ्वीवर दखेल शे, अधिकारींनी चुकमुये ती येस ते मी
दखेल शे.
6 मुर्खसले नेता पदनी जागा देवामा येस अनी ज्या यशस्वी व्हयेल र्‍हातस
त्यासले खालनी जागा देवामा येस.
7 ज्या नोकर शेतस त्यासले मी घोडावर जातांना दखं अनी ज्या यशस्वी लोके
व्हतात त्यासले नोकरनामायक जमीनवर चालतांना दखं.
8 ✡जो कोनी खड्डा खंदस, त्यामा तोच पडस अनी जो कोनी भित तोडी टाकस
त्याले साप चावस.
9 अनी जो कोनी वेसना दगड फोडस त्याले त्यानामुये इजा व्हस अनी जो लाकडं
तोडस तो संकटमा र्‍हास.
10 लोखंडी हत्यार बोथट व्हयनं अनी त्याले धार लाई नही तर जास्त ताकद
लावनी पडस, पण काम साध्य कराकरता बुध्दी उपयोगनी शे.
11 जर सापवर मंत्र प्रयोग व्हवानी आगोदर तो चावना तर मोरे मांत्रिकसना
काहीच उपयोग नही.
12 शहाणाना तोंडना वचन कृपामय र्‍हातस, पण मुर्खना तोंड त्यालेच गिळी
टाकस.
13 त्याना तोंडना वचन करानी सुरुवात मुर्खपना र्‍हास, अनी त्याना भाषन कराना
शेवट येडापना र्‍हास.
14 मुर्ख वचन वाढाईसन सांगस.
पण मोरे काय येनार शे हाई माणुसले माहीत नही. त्यानामांगे काय व्हई हाई
त्याले कोन सांगी?
15 मुर्ख कष्ट करीसन थकी जास, कारण शहरमा जावानी वाट त्याले माहीत
नही र्‍हास.
16 हे देश, तुना राजा पोर्‍यानीमायक व्हई अनी अधिपती सकायसले जेवानी
सुरुवात करी तर तुनी कितली वाईट परीस्थिती व्हई!
17 पण जर राजा उचा कुळना पोर्‍या व्हई अनी तुना अधिपती नशा कराकरता
नही तर शक्तीकरता जेवन करत व्हतीन तवय तुना देश आनंदमां शे.

---

✡ **10:8 10:8** स्तोत्रसंहिता 7:15; नीतिसूत्रे 26:17

18 जर एखादा मानुस कामनी बारामा आळशी व्हई तर त्याना घर गयाले लागी
अनी त्याना धाबा पडी जाई.
19 लोके हासीमजाक कराकरता मेजवानी बनाडतस, द्राक्षरस जीवले सुख देस
अनी पैसा प्रत्येक गोष्टनी गरज पुरावस.
20 तु आपला मनमा सुध्दा राजाले शाप देवू नको. धनवानले आपली झोपानी
खोलीमा शाप देऊ नको कारण आकासमासला चिडा तुना शब्द लिसन जाई अनी
ज्या बाकीना चिडा शेतस ते त्या गोष्टी पसरावतीन.

# 11

## शहाणाना आचरन

1 तुनी भाकर पानीवर सोड कारण बराच दिनमा ती तुले परत भेटी
2 तु सात-आठ लोकेसले वाटी दे, कारण हाई जगमां कोनत्या वाईट गोष्टी व्हतीन
हाई तुमले माहीत नही,
3 जर ढग पानीघाई भरेल व्हई तर ते पृथ्वीवर सोताले खाली करतस, जर झाड
उत्तरकडे नहिते दक्षिणकडे पडनं मनजे ते जठे पडेल शे तठेच पडी राही.
4 जो वारा दखी राहास तो पेरणी कराव नही, जो ढगसना रंग दखी राहास तो
कापणी कराव नही.
5 जशे वारा कताईन येस हाई तुले माहीत नही, मायना गर्भमा शरीर कशे वाढतस
हाई जशे तुले कळस नही तशे बठं काही निर्मान करनारा देवना कार्यना आकलन
तुले करता येवावू नही.
6 सकासले बिवारा पेरी दे, अनी संध्याकायले हात आवरानं नही, कारन
त्यामाईन कोनतं फळ दि हाई नहिते दोनी मिळीसन चांगल व्हई हाई तुले माहीत
नही.
7 प्रकाश खरच गोड शे, अनी सुर्य डोयाघाई दखाले आनंद वाटस.
8 जर माणुस कितलाबी वरीस जगना तरी त्यामा तो आनंद करो, अनी येनारा
आंधारना दिनबी ईचार करो, कारण त्या बराच व्हतीन. जे बठं येस ते व्यर्थ शे.

## तरुणले सल्ला

9 हे तरूना, तु आपला तरूनपनमा आनंद कर, तुना तरूनपनना दिनमा तुना मन तुले
आनंदीत करो, अनी तुना मनले वाटी त्या मार्गतीन अनी तुना नजरमा ई तशे चाल;
पण या बठया गोष्टीसनीबारामा देव तुना न्याय करी. हाई तुना ध्यानमा राहु दे.

10 आपला मनमाईन राग काढी टाक, आपला शरीरना दु:खंकडे ध्यान देवू
नको, कारण तारून्य अनी सामर्थ्य हाई व्यर्थ शे.

# 12

1 तु आपला तरूनपणना दिनमासुध्दा आपला निर्मानकरतानी आठवन कर, वाईट
दिन येवाना आगोदर अनी सांगशी, माले हाई दिनमा काहीच सुख नही.
2 त्या दिनमा सुर्य, चंद्र अनी तारा यासना प्रकाशनी आगोदर आंधार वाढी अनी
पाणी पडावर काया ढग परत येतीन.
3 त्या येळले महालना पहारेकरी थरथर कापतीन अनी ताकदवान मानसे वाकी
जातीन, अनी दयनाऱ्या बाया थांबी जातीन कारण त्या कमी शेतस, अनी ज्या
खिडक्यासमाईन दखनाऱ्या शेतस त्यासले चांगल दखता येवावू नही.
4 त्या येळले जवय रस्तावरना दार बंद व्हतीन अनी घरटाना आवाज बंद व्हई
जाई, तवय चिडासना आवाजवर लोकेसनी झोप उडी जाई, अनी सर्वा गायनस्वर
बंद व्हई.
5 तवय माणुसले उचा ठिकाननी अनी रस्तावरनी पुढला धोकानी भीती
वाटी, अनी बदामना झाड फुली, तवय टोळ सोतानीमोरे भारी वाटी, अनी तवय
सहाजिकच इच्छा दुर्बल व्हई, तवय मानुस आपला अनंतकाळना घरले जाई, अनी
शोक करनारा रस्तावर फिरतीन.
6 मंग चांदीना दोर तुटी, सोनाना वाटका फुटी जाई, झरानीजोडेना घागर फुटी
जाई, हेरवरनी रहाट मुडी जाई.
7 ज्या ठिकानपाईन ती व्हई, माटी परत माटीले मियस अनी देवनी देयल आत्मा
परत त्यानाकडे जाई.
8 व्यर्थ हो व्यर्थ, उपदेशक सांगस बठं काही व्यर्थ शे.

## माणुसना कर्तव्य

9 उपदेशक ज्ञानी व्हता अनी तो लोकेसले ज्ञान शिकाडत गया, त्यानी इचार
करीसन अनी शोध करीसन बराच बोधवचन रचात.
10 सरय लिखेल सत्य अनी मनोहर वचन दखाना उपदेशकनी प्रयत्न करेल शे.
11 बुध्दीमाणना शब्द आगनामायक ऱ्हास; सभापतीना शब्द ठोकेल
खियानामायक ऱ्हातस; एकच मेंढपायपाईन ती मियेल शेतस.
12 मना पोऱ्या, यानाशिवाय दुसरा शिक्षणनाबारामा सावध ऱ्हाय, पुस्तक
लिखाले अंत नही शे, बराच पुस्तकवाचन शरीरले थकाडस.

13 आते बठं काही तुम्हीन ऐका; हाई बठासना अर्थ एकच शे की देवले भ्याईसन
ऱ्हाय, अनी त्यानी आज्ञा पाळ; माणुसन काम हाईच शे.
14 सर्वा बऱ्यावाईट गुप्त गोष्टीसना न्याय कराना येळले देव बठा कामन्या झडत्या
ली.

# प्रेम संदेश

## The Gospels of Matthew and Mark in the Ahirani language of India. Ahirani: प्रेम संदेश (Bible)

copyright © 2023 The Word for the World International and Ahirani Christi Iswari Mandli, Sakri, Dhule, Maharashtra

Language: अहिराणी (Ahirani)

Contributor: The Word for the World International

प्रेम संदेश

**जुना करार, 2025**

The Old Testament Books in Ahirani Language
The Word for the World International

This translation is made available to you under the terms of the Creative Commons Attribution Share-Alike license 4.0.

You have permission to share and redistribute this Bible translation in any format and to make reasonable revisions and adaptations of this translation, provided that:

- You include the above copyright and source information.
- If you make any changes to the text, you must indicate that you did so in a way that makes it clear that the original licensor is not necessarily endorsing your changes.
- If you redistribute this text, you must distribute your contributions under the same license as the original.

Pictures included with Scriptures and other documents on this site are licensed just for use with those Scriptures and documents. For other uses, please contact the respective copyright owners.

Note that in addition to the rules above, revising and adapting God's Word involves a great responsibility to be true to God's Word. See Revelation 22:18-19.

2025-07-11

---

PDF generated using Haiola and XeLaTeX on 10 Jul 2025 from source files dated 11 Jul 2025
6e2997e4-b06d-5108-bd98-2b3ff67a6f92